**कारखाने व आस्थापनांमध्ये खाजगी ठेकेदारामार्फत काम करणाऱ्या खाजगी सुरक्षा रक्षकांची मंडळात नोंदणी करण्याच्या पध्दतीबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग,**
**मंत्रालय, मुंबई ४०० ०३२**
**शासन निर्णय क्रमांक : एसजीए-१५१०/प्र.क्र. २३९४/कामगार-५**
**दिनांक :- १७ ऑक्टोबर, २०१३**

पहा :- १) शासन आदेश क्र.एसजीए-१५२००५/(२३२/६)/कामगार-५, दि.१९.६.२००६.
२) शासन निर्णय क्र.एसजीए-१५२००५/(२३२/६)/कामगार-५, दि.१९.६.२००६.
३) शासन आदेश क्र.एसजीए-१५२००९/प्र.क्र.१५८८/कामगार-५, दि.२.३.२००९.
४) शासन आदेश क्र.एसजीए-१५१०/प्र.क्र.२३९४/कामगार-५, दि.२५ ऑगस्ट २०१०.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्रात कारखाने, कंपन्या, व्यापारी आस्थापना इत्यादी ठिकाणी खाजगी ठेकेदारामार्फत खाजगी सुरक्षा रक्षक म्हणून नोकरी करीत असलेल्या सुरक्षा रक्षकांच्या हक्कांचे संरक्षण व्हावे तसेच सुरक्षा रक्षकांना त्यांच्या नोकरीचे नियमन करणे व त्यांच्या नोकरीच्या अटी व शर्ती व त्यांचे कल्याण यासाठी आणि त्यांच्याशी संबंधित बाबी यासाठी अधिक चांगल्या तरतुदी करणे, अशा सुरक्षा रक्षकांचा पुरवठा योग्य प्रकारे व्हावा या उद्देशाने शासनामार्फत महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या कलम ३ मध्ये व त्याखालील योजना, २००२ (सुधारीत) या अंतर्गत तरतूद करण्यांत आली आहे. सन १९८१ पासून हा कायदा अंमलात आला असून त्यासाठी सदर योजनेची अंमलबजावणी आणि संनियंत्रण करण्यासाठी बृहन्मुंबई व ठाणे, रायगड, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, धुळे, सांगली, अहमदनगर, अमरावती, चंद्रपूर व कोल्हापूर इत्यादि ठिकाणी सुरक्षा रक्षक मंडळांची निर्मिती करण्यांत आली आहे. सुरक्षा रक्षक मंडळाच्या कामाची तसेच अधिनियमांतर्गत तरतूदींची प्रभावी अंमलबजावणी करतानां सुरक्षा रक्षकांची नोंदणी करण्याच्या प्रक्रियेत काही अडचणी आढळून आल्याने सदरहू प्रक्रिया अधिक सूलभ करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती. त्यादृष्टीने शासनाने आता खालीलप्रमाणे निर्णय घेतलेला आहे :-

**शासन निर्णय :-**

या विभागाच्या दि.२५ ऑगस्ट, २०१० च्या शासन निर्णयान्वये मंडळात नोंदणी होण्यासाठी संबंधीत सुरक्षा रक्षकांनी १८० दिवस काम केल्याचा पुरावा मालकाकडून घेण्याची तरतूद करण्यांत आली होती. हा १८० दिवसांचा कालावधी खुपच मोठा असल्याने तसेचअसा कोणताही पुरावा मालक ठेवत नसल्यामुळे सुरक्षा रक्षकांना त्यांच्या नोंदणीबाबत अडचण निर्माण होत होती. त्यामुळे सुरक्षा रक्षकांच्या नोंदणी संदर्भात व मैदानी परीक्षेसाठीच्या वयोमर्यादेसंदर्भात अडचणी येत असल्याने नोंदणी संदर्भातील दि.२५/८/२०१० रोजीच्या शासन निर्णयात खालीलप्रमाणे सुधारणा करण्यात येत आहेत :-

१) खाजगी सुरक्षा रक्षकांनी मालकाकडे १८० दिवसाऐवजी ६० दिवस काम केल्याचा पुरावा दिल्यास संबंधित मंडळाने अशा सुरक्षा रक्षकांची नोंदणी करावी अथवा मंडळाच्या अधिकाऱ्याचा निरीक्षण अहवाल ग्राह्य धरण्यात येवून नोंदणी करावी.

.....२

२) मुळ मालकाने अशा सुरक्षा रक्षकांच्या नोंदणी करण्यास संमती न दिल्यास मंडहाने अशा सुरक्षा रक्षकाचा अर्ज घेऊन नोंदणी करावी व त्याच मुळ मालकाने ते सुरक्षा रक्षक ठेवण्यास मान्यता न दिल्यास खाजगी सुरक्षा रक्षकांना मंडळाच्या प्रतिक्षा यादीवर ठेवण्यांत यावे.

३) खाजगी सुरक्षा एजन्सीमार्फत विविध आस्थापनांमध्ये कार्यरत असणारे व ज्यांचे वय ३५ वर्षांपेक्षा जास्त आहे अशा सुरक्षा रक्षकांना मंडळामध्ये नोंदीत करताना शासन निर्णय क्र. एसजीए-१५२००९/प्र.क्र.१५८८/कामगार-५, दि.२/३/२००९ मधील क्र.५ अन्वये विषद केल्यानुसार मैदानी परीक्षा लागू असणार नाही. तथापि ३५ वर्षांपेक्षा कमी वय असणाऱ्या सुरक्षा रक्षकांनी उक्त शासन निर्णयानुसार मेदानी परीक्षा पात्रतेचे निकष पूर्ण करणे आवश्यक असेल.

वरील सुधारणांव्यतिरिक्त इतर सर्व तरतूदी यापूर्वी नोंदणी संदर्भात शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयांप्रमाणेच राहतील.

हा शासन निर्णय महाराष्ट्र खाजगी सुरक्षा रक्षक (नोकरीचे नियमन व कल्याण) अधिनियम, १९८१ च्या कलम ८(४) अन्वये निर्गमित करण्यांत येत आहे. सदर शासन निर्णय निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येईल.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

सदरहू शासन निर्णय शासनाच्या संकेतस्थळावर २०१३१०१७१३०३५४४७१० या क्रमांकाने उपलब्ध करुन देण्यांत आला आहे.

सही/-
( ना. द. थोरवे )
**कार्यासन अधिकारी**

प्रत :-

१) मा. मंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
२) मा. राज्यमंत्री (कामगार) यांचे खाजगी सचिव
३) मा. प्रधान सचिव (कामगार) यांचे स्वीय सहाय्यक
४) कामगार आयुक्त, महाराष्ट्र राज्य, मुंबई
५) सह कामगार आयुक्त (माथाडी), महाराष्ट्र राज्य, मुंबई
६) अध्यक्ष, सुरक्षा रक्षक मंडळ, बृहन्मुंबई व ठाणे, रायगड, पुणे, नाशिक, औरंगाबाद, नागपूर, धुळे, सांगली, अहमदनगर, अमरावती, चंद्रपूर व कोल्हापूर.
७) संचालक, महाराष्ट्र श्रम विज्ञान संस्था, दादाभाई चमारबागवाला मार्ग, परळ, मुंबई ४०० ०१२
८) सर्व जिल्हा सहाय्यक कामगार आयुक्त व जिल्हा कामगार अधिकारी
९) सर्व विशेष जिल्हा समाजकल्याण अधिकारी/रोजगार व स्वयंरोजगार अधिकारी